ePaper

# देशात वन नेशन वन हसबंड राबवताय का? राऊत भडकले


| वर्ष - 8 | अंक - 295 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

www.mahaenews.com | सोमवार , दि. 2 जून 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!





## आतील पानांत


- इंग्लंडचा इंडिजवर दणदणीत विजय!
- सूर्यकुमार यादवने रचला इतिहास!
- तुम्ही कृष्णाचं सैन्य घेऊ शकता
- गाझामध्ये पुन्हा नरसंहार


## बांगला देशाच्या माजी पंतप्रधानाला मृत्युदंडाची शिक्षा सुनावली जाणार ?

# शेख हसीना यांच्या फाशीसाठी बांगला देशमध्ये दोरखंड तयार!

### उठावाविरोधात केलेली कारवाई मानवतेविरुद्ध असल्याचा आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधीकरणाचा ठपका !

। ढाका / नवी दिल्ली । प्रतिनिधी । महाईन्यूज

**बांगला देशाच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्यावर मोठे संकट कोसळले आहे. गेल्या जुलै महिन्यात त्यांच्या विरोधात झालेल्या उठावाविरोधात त्यांनी केलेली कारवाई ही मानवतेविरुद्ध होती, असा ठपका आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधीकरणाने दिला असून त्यांना दोषी ठरविले आहे. त्यामुळे आता त्यांना मृत्युदंडाची शिक्षा ठोठावली जाण्याची शक्यता आहे. बांगला देशातील राजकीय तज्ज्ञांच्या मते शेख हसीना यांच्या फाशीसाठी सध्याच्या सरकारने दोरखंडसुद्धा तयार करून ठेवला आहे.**



### असा आवळला जातोय फास

बांगला देशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. गेल्या वर्षी जुलै महिन्यात त्यांच्या सरकारविरोधात उद्रेक झाला होता. त्यावेळी त्यांनी आदेश देऊन केलेली कारवाई ही मानवतेविरुद्ध असल्याचा ठपका आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणात अभियोक्ता पक्षाने ठेवला आहे. त्यात त्यांना दोषी ठरवण्यात आले. शेख हसीनाला मृत्यदंड होणार हे जवळजवळ निश्चित झाले आहे.

### शेख हसीना प्रचंड संकटात..

बांगला देशच्या शेख हसीना यांच्या अडचणी या निर्णयामुळे खूपच वाढल्या आहेत. आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणात अभियोक्ता पक्षाने शेख हसीना सत्तेवर असताना गेल्या जुलै महिन्यात त्यांच्या सरकार विरुद्ध जे बंड झाले होते, त्या उठवादरम्यान केलेली कारवाई ही मानवतेविरुद्ध गुन्हा असल्याचा ठपका ठेवला आहे.

### दोषारोप पत्रात स्पष्ट उल्लेख..

या अभियोक्त्याने रविवारी याप्रकरणी दोषारोपपत्र दाखल केले आहे. शेख हसीना यांच्या सरकारविरोधात हे आरोप सिद्ध झाले, तर शेख हसीना यांना फाशीची शिक्षा सुद्धा होऊ शकते, असे तेथील मीडिया आणि वृत्तपत्रांचे मथळे असले तरी त्यांना फाशी द्यायची आहे हे आधीच ठरले आहे. आता फक्त कागदपत्रे रंगविणे एवढेच बाकी आहे, असे तेथील ज्येष्ठ आणि सत्ताधारी राजकारणी उघडपणे सांगत आहेत.

### गृहमंत्रीसुद्धा जबाबदार..

या दोषारोपपत्रात शेख हसीना यांच्यासह माजी गृहमंत्री असदुज्जमां खान कमाल आणि माजी आय. जी. पी. चौधरी मामून हे सहआरोपी आहेत. या खटल्याचे बांगला देशातील सर्व टीव्ही चॅनल्सवर थेट प्रसारण करण्यात येत आहे. त्यामुळे या प्रकरणात पारदर्शकता कायम असेल, असे सरकारतर्फे सांगण्यात येत आहे.

### दि. 12 मे रोजी अहवाल सादर

शेख हसीना यांच्यावर लावलेल्या आरोपात गेल्या वर्षी जुलै आणि ऑगस्ट महिन्यात देशभरात पसरलेला हिंसाचार आणि त्यानंतर पोलिसांनी केलेला गोळीबार, सामूहिक हत्याकांड करण्यासाठी हसीना यांच्या सरकारने प्रोत्साहन दिल्याचे म्हटले आहे. यापूर्वी दि. १२ मे रोजी तपास अधिकाऱ्यांनी एक अहवाल सादर केला होता. त्यामध्ये शेख हसीना यांचा या हत्याकांडामागे हात असल्याचे म्हटले होते. त्यांनीच याविषयीचे आदेश दिल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे, आणि तो सिद्ध होईल अशा तऱ्हेने कागदपत्रे देखील रंगवल्याचे सांगण्यात येते.

### न्यायाधीकरणाचे गौडबंगाल !

महत्त्वाचा भाग म्हणजे ज्या न्यायाधीकरणात हा खटला सुरू आहे. ते पाकिस्तानातून स्वतंत्र झाल्यानंतर पाकिस्तानी सैनिकांवर खटला चालवण्यासाठी सुरू करण्यात आले होते. या न्यायाधीकरणात यापूर्वी जमात आणि 'बांगला देश नॅशनल पार्टी' च्या नेत्यांविरोधात खटले चालवण्यात आले आहेत.

### हसीना भारताच्या आश्रयाला

तख्तापालटानंतर शेख हसीना या भारताच्या आश्रयाला आल्या आहेत. देशात एका खास गटाने सत्ता उलथवण्यासाठी हिंसाचार घडवून आणला होता. त्यानंतर हसीना यांनी भारतात पलायन केले. बांगलादेशातील सध्याचे युनूस सरकार शेख हसीना यांना बांगलादेशात परत पाठवण्याची मागणी करत आहे. पण, भारताने त्यावर अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. भारत आणि शेख हसीना यांचे संबंध पक्के होते. युनूस सरकार हे पाकिस्तानच्या हातातील कठपुतली आहे. ते चीनधार्जीणे आहे. ज्या भारताने बांगलादेशला स्वातंत्र्य मिळवून दिले.

### संपूर्ण वातावरणच भारतविरोधी !

सध्या बांगलादेशात सत्तेवर असलेले युनूस सरकार हे दररोज भारताविरोधात गरळ ओकत आहे. सरकारची भूमिका ही पूर्वग्रहदूषित असून शेख हसीना भारताच्या आश्रयाला असल्यामुळे भारताविरोधातील आरोपांना मोठी धार चढली आहे. पाकिस्तानपासून बांगला देशला दूर करण्यात भारताचा मोठा वाटा आहे, त्यामुळे आधीच त्यांचा भारतावर राग आहे, तेथील सर्व न्यूज चॅनेल्स वर भारताच्या विरोधात वातावरण कसे होईल, याची सर्वजण खबरदारी घेत आहेत.

### चीनचे मार्गदर्शन...

सध्याच्या युनूस सरकारला चीनकडून रोज मार्गदर्शन होत असते. ते बराच काळ चीनच्या संपर्कात असतात तसेच चीनच्या वरिष्ठ नेत्यांनाही भेटून येतात. याशिवाय पाकिस्तान लष्कराचे अनेक प्रमुख पदाधिकारी आणि दहशतवाद्यांचे म्होरके देखील युनूस यांना सल्ला देण्यासाठी अधून मधून बांगला देशच्या दौऱ्यावर असतात हे देखील आता उघड झाले आहे.

# भविष्यातील महासाथी रोखणार 'नक्षत्र'!

## केंद्र सरकारकडून देशातील पहिला प्रकल्प पुण्यात सुरू

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गुंतागुंतीच्या जनुकीय विदेचे जलद विश्लेषण आणि भविष्यातील महासाथींना रोखण्याच्या सज्जतेसाठी राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेत (एनआयव्ही) 'नक्षत्र' सुविधा सुरू करण्यात आली आहे. ही देशातील पहिली उच्च कार्यक्षमता संगणन सुविधा असून, या माध्यमातून अत्याधुनिक सार्वजनिक आरोग्य संशोधनाच्या क्षेत्रात मोठा टप्पा गाठण्यात आला आहे.**




'नक्षत्र'चे उद्घाटन केंद्रीय आरोग्य संशोधन सचिव व भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेचे (आयसीएमआर) महासंचालक डॉ. राजीव बहल यांच्या हस्ते झाले. या वेळी 'एनआयव्ही'चे संचालक डॉ. नवीन कुमार उपस्थित होते. पंतप्रधान आयुष्मान भारत आरोग्य पायाभूत सुविधा मोहिमेंतर्गत उच्च कार्यक्षमता संगणनावर आधारित प्रगत जनुकीय क्रमनिर्धारण केंद्र उभारण्यात येणार आहे. 'नक्षत्र' हा त्याचाच भाग आहे. या माध्यमातून जनुकीय आणि जैवमाहिती विदा प्रक्रियेत अमूलाग्र बदल होणार आहे. करोना संकटावेळी पारंपरिक संगणनाच्या पायाभूत सुविधांमुळे सरकारला अनेक मर्यादा आल्या होत्या. त्यावर उपाय म्हणून सरकारने हा प्रकल्प हाती घेतला आहे.

'विकसित भारताच्या दिशेने योग्य वेळी टाकलेले हे पाऊल आहे. 'नक्षत्र'मुळे देशातील जनुकीय सर्वेक्षण आणि विदा विश्लेषण क्षमतेत फार मोठी वाढ होणार आहे. भविष्यातील आरोग्य संकटे आणि महासाथींचा सामना करण्यासाठीच्या सज्जतेत यामुळे भर पडेल,' असे डॉ. राजीव बहल यांनी सांगितले. 'महासाथींना रोखण्यासाठी नवीन उच्च कार्यक्षमता संगणन सुविधा महत्वाची भूमिका बजावेल,' असे डॉ. नवीन कुमार यांनी स्पष्ट केले.

'नक्षत्र' सुविधेमध्ये १२ कम्प्युट नोड्स असून, त्यातून एकूण ७०० गाभा क्षमता आणि १ पेटाबाइट साठवण क्षमता उपलब्ध होणार आहे. या पायाभूत सुविधेमुळे गुंतागुंतीच्या जैवमाहितीवर प्रक्रिया करून प्रगत जनुकीय क्रमनिर्धारण करता येणार आहे. तसेच, जनुकशास्त्राच्या ट्रान्सक्रिप्टोनॉमिक्स, फायलोजेनेटिक्स, मेटाजिनोमिक्स या शाखांच्या विदेचे विश्लेषणही करता येईल. भविष्यात या सुविधेमुळे विषाणू संशोधन आणि निदान प्रयोगशाळांना मोठे पाठबळ मिळणार आहे. 'नक्षत्र'चे उद्घाटन केंद्रीय आरोग्य संशोधन सचिव व भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेचे (आयसीएमआर) महासंचालक डॉ. राजीव बहल यांच्या हस्ते झाले. या वेळी 'एनआयव्ही'चे संचालक डॉ. नवीन कुमार उपस्थित होते. पंतप्रधान आयुष्मान भारत आरोग्य पायाभूत सुविधा मोहिमेंतर्गत उच्च कार्यक्षमता संगणनावर आधारित प्रगत जनुकीय क्रमनिर्धारण केंद्र उभारण्यात येणार आहे. 'नक्षत्र' हा त्याचाच भाग आहे. या माध्यमातून जनुकीय आणि जैवमाहिती विदा प्रक्रियेत अमूलाग्र बदल होणार आहे. करोना संकटावेळी पारंपरिक संगणनाच्या पायाभूत सुविधांमुळे सरकारला अनेक मर्यादा आल्या होत्या.

त्यावर उपाय म्हणून सरकारने हा प्रकल्प हाती घेतला आहे. 'विकसित भारताच्या दिशेने योग्य वेळी टाकलेले हे पाऊल आहे.यामुळे भर पडेल,' असे डॉ. राजीव बहल यांनी सांगितले. 'महासाथींना रोखण्यासाठी नवीन उच्च कार्यक्षमता संगणन सुविधा महत्वाची भूमिका बजावेल,' असे डॉ. नवीन कुमार यांनी स्पष्ट केले.

### 'नक्षत्र'चा फायदा

'नक्षत्र'मुळे अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर सार्वजनिक आरोग्यासाठी शक्य आरोग्य साथींचा सामना करण्याचा वेग, अचूकता आणि सज्जता यात सुधारणा गुंतागुंतीच्या जनुकीय विदेचे अतिशय जलद सर्वेक्षण नवीन रोगांच्या धोक्याचा लवकर शोध अधिक प्रभावी पद्धतीने महासाथी रोखण्याची कार्यवाही कृत्रिम प्रज्ञा (एआय) आधारित लस व औषध विकासाला गती

# शरद पवार -अजित पवार यांच्यात बंद दाराआड चर्चा

## निवडणुकीआधी दोन्ही पक्ष एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्राच्या राजकारणात काहीही घडू शकतं. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडणार आहेत. या निवडणुकीत आपल्या पक्षाला सर्वाधिक यश मिळावं, यासाठी प्रत्येक पक्षाकडून रणनीती आखली जात आहे. विशेष म्हणजे या निवडणुकांआधी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे गट एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. उपमुखंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील काँग्रेस पक्ष सत्तेत आहे.**



तर ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या नेतृत्वातील पक्ष महाविकास आघाडीत आहे. विधानसभा निवडणुकीत अजित पवारांच्या पक्षाला चांगलं यश मिळालं. पण शरद पवारांच्या पक्षाला अपेक्षित यश मिळालं नाही. यानंतर आता आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीआधी दोन्ही पक्ष एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. विशेष म्हणजे या चर्चा सुरु असतानाच आता मोठी बातमी समोर येत आहे. तीन दिग्गज नेत्यांची एकत्र आणि बंद दाराआड बैठक झाल्याची माहिती समोर येत आहे.महाराष्ट्राच्या राजकारणात काहीही घडू शकतं. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडणार आहेत. या निवडणुकीत आपल्या पक्षाला सर्वाधिक यश मिळावं, यासाठी प्रत्येक पक्षाकडून रणनीती आखली जात आहे. विशेष म्हणजे या निवडणुकांआधी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे गट एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. उपमुखंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील काँग्रेस पक्ष सत्तेत आहे. तर ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या नेतृत्वातील पक्ष महाविकास आघाडीत आहे. विधानसभा निवडणुकीत अजित पवारांच्या पक्षाला चांगलं यश मिळालं. पण शरद पवारांच्या पक्षाला अपेक्षित यश मिळालं नाही. यानंतर आता आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीआधी दोन्ही पक्ष एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. विशेष म्हणजे या चर्चा सुरु असतानाच आता मोठी बातमी समोर येत आहे. तीन दिग्गज नेत्यांची एकत्र आणि बंद दाराआड बैठक झाल्याची माहिती समोर येत आहे. विधानसभा निवडणुकीत अजित पवारांच्या पक्षाला चांगलं यश मिळालं. पण शरद पवारांच्या पक्षाला अपेक्षित यश मिळालं नाही. यानंतर आता आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीआधी दोन्ही पक्ष एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. विशेष म्हणजे या चर्चा सुरु असतानाच आता मोठी बातमी समोर येत आहे. तीन दिग्गज नेत्यांची एकत्र आणि बंद दाराआड बैठक झाल्याची माहिती समोर येत आहे.महाराष्ट्राच्या राजकारणात काहीही घडू शकतं. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडणार आहेत. या निवडणुकीत आपल्या पक्षाला सर्वाधिक यश मिळावं.

### पवारांच्या पक्षाला चांगलं यश मिळालं

प्रत्येक पक्षाकडून रणनीती आखली जात आहे. विशेष म्हणजे या निवडणुकांआधी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे गट एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. उपमुखंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील काँग्रेस पक्ष सत्तेत आहे. तर ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या नेतृत्वातील पक्ष महाविकास आघाडीत आहे. विधानसभा निवडणुकीत अजित पवारांच्या पक्षाला चांगलं यश मिळालं.

## लग्न, सण समारंभासाठी

# मराठा समाजाने तयार केली आचारसंहिता!

### लग्न व्यवस्थेच्या आचारसंहितेचे सर्वांनी पालन करावे; सकल मराठा समाजाचे आवाहन

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लग्न व्यवस्था, इतर कार्यक्रम व समारंभ याबाबतीत आचारसंहिता घालून देण्यात आलेली आहे. सर्व समाज बांधवांनी या आचारसंहितेचे पालन करण्याचे आवाहन बैठकीत करण्यात आले.**





पिपरी चिंचवड शहरातील सकल मराठा समाजाच्या वतीने रविवारी काळेवाडी येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. वैष्णवी हगवणे - कस्पटे हिच्या बाबतीत जी दुर्घटना घडली त्या घटनेचे पडसाद संपूर्ण राज्यात पडले आहेत. या घटनेमुळे मराठा समाजाबद्दल उलट सुलट चर्चा सुरु आहेत. त्यामुळे पुणे शहरातील सकल मराठा समाजाने लग्नव्यवस्थेसंदर्भात एकत्र बैठक घेऊन काही अटी व नियम लागू केलेले आहेत.

याच धर्तीवर पिंपरी चिंचवड शहर सकल मराठा समाजाच्या वतीने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. वैष्णवीस श्रद्धांजली अर्पण करून या बैठकीस सुरुवात करण्यात आली. या बैठकीत समाजाची भविष्यातील वाटचाल व त्यासंदर्भात काही नियम व धोरणे निर्धारीत करण्यात आली आहेत. लग्न व्यवस्था व इतर कार्यक्रम व समारंभ याबाबतीत आचारसंहिता घालून देण्यात आलेली आहे. सर्व समाज बांधवांनी या आचारसंहितेचे पालन करण्याचे आवाहन या बैठकीत करण्यात आले. यावेळी पिंपरी चिंचवड शहरातील मोठ्या प्रमाणात मराठा समाज बांधव व इतर समाजबांधवही उपस्थित होते. हा विषय फक्त मराठा समाजापुरता मर्यादित नसल्याने इतर समाज बांधवांनाही बैठकीस उपस्थित राहण्यासाठी आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी बऱ्याच उपस्थितांकडून वेगवेगळ्या सूचना करण्यात आल्या. या सूचनांचा समावेश आचारसंहितेत करण्यात येणार आहे.

प्रास्ताविक भाऊसाहेब भोईर यांनी केले . सूत्रसंचालन नाना शिवले यांनी तर प्रशांत शितोळे यांनी आचारसंहितेचे वाचन करून आभार मानले. यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शहर प्रमुख संजोग वाघेरे पाटील, खासदार श्रीरंग बारणे, आमदार शंकर जगताप, विलास लांडे, सुरेश भोईर, नाना काटे, मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक राजेंद्र कोंढरे, महाराष्ट्र राज्य कुंभार समाजाचे प्रमुख सतीश दरेकर, भानुप्रताप बर्गे, राजेंद्र कुंजीर, पुणे शहर समन्वयक सचिन आडेकर, मराठा महासंघ संपर्कप्रमुख अनिल तागडे, सचिन साठे, अतुल शितोळे, एन बी भोंडवे, मधुकर चिंचवडे, धोंडीबा भोंडवे आदींनी मनोगत व्यक्त केले.

#### समाजहितासाठी अनुकरणीय निर्णय

ही बैठक समाजातील विवाह व्यवस्थेतील बदलत्या प्रवाहावर सकारात्मक चर्चा व ठोस उपाययोजना करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरली आहे. समाजहितासाठी एकसंघ निर्णय घेण्याची ही कृती अनुकरणीय ठरणार आहे, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

---

## तब्बल 15 वर्षांनंतर अग्निशमन केंद्राची मागणी पूर्ण

### महापालिका स्वतंत्र अग्निशमन केंद्र उभारणार; 22 कोटी 84 लाख 75 हजार रुपयांची निविदा प्रसिद्ध

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी, चिंचवड आणि भोसरीतील औद्योगिक विकास महामंडळासाठी (एमआयडीसी) पिंपरी-चिंचवड महापालिका स्वतंत्र अग्निशमन केंद्र उभारणार आहे. हे केंद्र एमआयडीसीने दिलेल्या टाटा मोटर्सच्या मालवाहतूक प्रवेशद्वारासमोरील मोकळ्या भूखंडावर (प्लॉट क्रमांक एफ-टू ब्लॉक) येथे उभारण्यात येणार आहे. त्यासाठी महापालिकेने २२ कोटी ८४ लाख ७५ हजार रुपयांची निविदा प्रसिद्ध केली आहे. औद्योगिक नगरी असलेल्या पिंपरी चिंचवड मध्ये तब्बल पंधरा वर्षांनंतर उद्योजकांची मागणी पूर्ण होत आहे.**




सद्यःस्थितीत पिंपरी-चिंचवड एमआयडीसीत बहुउद्देशीय कंपन्यांना सुटे भाग पुरविणारे सुमारे १६ हजार सूक्ष्म, लघुउद्योग सुरू आहेत. या १६ हजार उद्योगांमध्ये सात लाख कामगारांच्या हाताला रोजगार मिळाला आहे. लघु उद्योग वाहनांचे सुटे भाग (ऑटोमोबाइल्स पार्टस) संरक्षण विभागाला लागणारे सुटे भाग, प्रेस पार्ट, रबर, प्लास्टिक, इंजिनीअरिंग कंपन्यांसाठीचे फॅब्रिकेशन उत्पादन करतात. शहरातील मोठ्या उद्योगांसह विदेशातील उद्योगांना हे सुटे भाग पुरविले जातात.

एमआयडीसीतील एखाद्या कंपनीला आग लागल्यास संत तुकारामनगर येथील अग्निशमन केंद्रावर अवलंबून रहावे लागत होते. हे अंतर लांब असल्याने बंब येण्यास विलंब होत असल्याने उद्योजकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत होते. उद्योगांसाठी एमआयडीसी परिसरात स्वतंत्र अग्निशमन केंद्र असावे, यासाठी एमआयडीसीने भोसरी येथील प्लॉट क्रमांक एफ-टू ब्लॉक येथे भूखंड राखीव ठेवला होता. या भूखंडावर अग्निशमन केंद्र उभारण्याची पिंपरी-चिंचवड लघु उद्योग संघटनेची 15 वर्षांपासूनची मागणी होती. यासंदर्भात उद्योग मंत्र्यांकडे बैठका झाल्या.

> एमआयडीसीने अग्निशमन केंद्र उभारण्यासाठी भूखंड महापालिकेच्या ताब्यात दिला आहे. याठिकाणी अत्याधुनिक असे अग्निशमन केंद्र आणि कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने उभारण्यात येणार आहेत. या केंद्रामुळे एमआयडीसी आणि परिसरातील रहिवाशी भागात आगीच्या घटना घडल्यास ती विझविण्यासाठी मदत होणार आहे.
>
> **-मकरंद निकम,** शहर अभियंता, पिंपरी-चिंचवड

> अग्निशमन केंद्र उभारण्याची उद्योजक, विविध अस्थापना तसेच पिंपरी-चिंचवड लघु उद्योग संघटनेची 15 वर्षांपासूनची मागणी होती. यासंदर्भात वेळोवेळी राज्यशासन, महापालिका, उद्योगमंत्री, एमआयडीसी या सर्वांचीभेटघेतली.निवेदनेसादरकेली.यापाठपुराव्यालायशमिळतानादिसतआहे.
>
> **-संदीप बेलसरे,** अध्यक्ष, पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटना

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### कर्तेपणा टाकणे हाच परमार्थ !

दोरीला जो साप म्हणून समजला तो बद्ध; पण दोरीला दोरी म्हणून ज्याने ओळखले, तो मुक्त समजावा. 'देही मी नव्हे' हे ज्याला समजले तो मुक्तच. सत्यज्ञान करून घेणे म्हणजेच मुक्तावस्था आहे. बद्धदशा आमची आम्ही निर्माण केली. काळजी, तळमळ आणि दुःख ही बद्धपणाची लक्षणे होत, तर कोणत्याही परिस्थितीत आनंदात राहणे हे मुक्तपणाचे लक्षण आहे. जागे होणे म्हणजे मुक्तदशेला येणे आहे. माझे माझ्याजवळच आहे, पण ते ठाऊक नाहीसे झाले आहे. भगवंताला विसरल्याने 'मी देही' असे म्हणू लागलो. देह तर माझ्या ताब्यात नाही, तेव्हा मी देही नाही हे सिद्ध झाले. आपण कर्तेपण आपल्याकडे घेतो, आणि त्याबरोबर सुखदुःखही आपल्याकडे येते. मला सुख नाही आणि दुःखही नाही असे ज्याला वाटेल, तो मुक्त समजावा. कर्तेपण घातुक असते. मी एवढा मोठा वाडा बांधला, प्रपंच चांगला केला, असा प्रापंचिकाला अभिमान वाटतो, तर संन्यासी मठाचाच अभिमान धरून बसतो ! म्हणजे या कर्तेपणाच्या बाधेतून दोघांचीही सहजी सुटका होत नाही. हे कर्तेपण सोडावेसे वाटले तरी ते आपल्याला सुटत नाही, याचा आपल्याला नेहमी अनुभव येतो. भगवंताचे अस्तित्व पटल्यानेच कर्तेपणा कमी होतो. म्हणून, भगवंताच्या अखंड स्मरणात राहावे, आणि भगवंत ठेवील त्यात समाधान मानावे. भगवंताच्या स्मरणाशिवाय जिथे आपल्याला सुख होते, तो विषय समजावा. विषयाच्या संगतीत परमात्म्यापासून वेगळे असणे याचे नाव प्रपंच, आणि परमात्म्याच्या संगतीत विषयात राहणे याचेच नाव परमार्थ. फळाची अपेक्षा ठेवून आपण जी कृती करतो ते कर्म होय; पण फळाची अपेक्षा न ठेवता आपण जे कर्म करतो ते कर्तव्य ठरते. आणि असे कर्तव्य भगवंताच्या स्मरणात करीत राहणे हाच परमार्थ. हे करीत असताना भगवंताला दृष्टिआड न होऊ देणे, याचेच नाव अनुसंधान होय. समजा, आपण एखादे चांगले पुस्तक वाचीत बसलो आहोत, इतक्यात आपल्या पायाला एक मुंगी चावली; त्याची जाणीव आपल्याला कशी चटकन होते ! ती जाणीव सर्व शरीरभर व्यापून असते, त्याचप्रमाणे भगवंताच्या अनुसंधानाने प्रपंचाला व्यापून ठेवले पाहिजे. प्रपंचातला कोणताही उद्योग करताना अनुसंधान टिकवावे. अनुसंधानाचा अभ्यास करावा. भगवंताचे अनुसंधान आपल्याला भगवंताकडे घेऊन जाते. मी अनुसंधान टिकवीन असा मनाचा निश्चय करावा.

बोधवचन:- आपले कर्तव्याला न विसरावे।
भगवंताचे अनुसंधान राखावे॥

# पाक नव्हे, अमेरिका पण नाही, चीनच भारताचा 'शत्रू नंबर 1' !



**'स्टेट'मेंट**

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**'ऑपरेशन सिंदूर' भारताने यशस्वीरीत्या पार पाडल्यानंतर आणि पाकिस्तानची धूळधाण उडाल्यानंतर संपूर्ण जगात बोलबाला झाला, तो भारताच्या विजयाचा! मग सुरू झाले, एकमेकांना अडवण्याचे तंत्र ! पाककडून भारताची अडवणूक, अमेरिकेकडून धमक्या तर चीनकडून गुप्त हालचाली..**



### भारताने तर नाकच दाबले..

या सर्वावर उपाय म्हणून भारताने तर सिंधू नदीचे पाणी अडवून पाकचे नाकच दाबले आहे. तरीसुद्धा चीन उघडपणे पाकिस्तानच्या पाठीशी ठाम उभा आहे, तर भारताला अडचणीत आणण्याची धोरणे अमेरिकेकडून आखली जात आहेत. त्यामुळे भारताचा नेमका शत्रू कोण, याचा विचार आता जागतिक तज्ज्ञ करू लागले आहेत. पण एकूण कानोसा घेतला, आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या विचारवंतांशी सल्लामसलत केली, तर एक गोष्ट स्पष्ट जाणवते की भारताचा मोठा शत्रू हा पाकिस्तान नाही किंवा अमेरिकन नाही.. तर क्रमांक एकचा शत्रू हा चीनचा आहे !

### अमेरिकेचा संरक्षणविषयक अहवाल..

अमेरिकेच्या 'डिफेन्स इंटेलिजन्स एजन्सी' ने त्यांच्या सरकारला नुकताच एक अहवाल सादर केला आहे. जगात कोठे काय सुरु आहे, त्याचा अमेरिकेवर काय परिणाम होणार, याचे विश्लेषण वारंवार केले जाते, आणि तो अहवाल अमेरिकेच्या सरकार पुढे मांडला जातो. यावेळी, त्यात भारत-पाकिस्तानचे ताणलेले संबंध, भारताने पाकिस्तानच्या विरोधात केलेली लष्करी कारवाई, चीनकडून पाकिस्तानवर होणारी लष्करी आणि आर्थिक मदतीची खैरात, चीनच्या भारताविरुद्ध सुरू असलेल्या कुरापती अशा गोष्टींचा स्पष्ट उल्लेख केला आहे. भारत चीनला आणि चीन भारताला मुख्य प्रतिस्पर्धी मानतो, हे सुद्धा त्या अहवालात म्हटले आहे !

### पाकिस्तान ही दुय्यम समस्या..

भारताच्या दृष्टीने चीनच प्रमुख शत्रू आहे, किंबहुना शत्रू क्रमांक एक तोच आहे. चीनच्या तुलनेत पाकिस्तान दुय्यम समस्या आहे, असे भारत मानतो, अशा प्रकारचे निरीक्षण अमेरिकेतील 'डिफेन्स इंटेलिजन्स एजन्सी' च्या ताज्या अहवालात नोंदवले गेले आहे. या अहवालात पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कार्यशैलीचा उल्लेखही करण्यात आला आहे. जागतिक स्तरावर नेतृत्व करण्यावर आणि भारताची लष्करी ताकद वाढवण्यावर पंतप्रधान मोदींचा भर राहील, असे निरीक्षण या अहवालात नोंदवण्यात आले आहे. जगभरात कोणत्या देशात काय सुरु आहे? कुठे तणाव आहे? कुणाला कोणापासून धोका आहे? कोणते देश जवळ येत आहेत? अशा गोष्टींचा उल्लेख अमेरिकेच्या या अहवालात केला जातो.

### अहवालात नेमके काय म्हटले आहे ?

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे संरक्षणविषयक तीन प्रमुख गोष्टींना प्राधान्य राहील, अशी नोंद स्पष्टपणे या अहवालात करण्यात आली आहे. जागतिक स्तरावर नेतृत्व करणे, चीनच्या कुरापतींवर मात करणे आणि भारताची लष्करी ताकद वाढवण्यावर मोदी सरकारचा भर असेल, असा त्यात उल्लेख असून नरेंद्र मोदी म्हणजेच पर्यायाने भारताची ताकद किती वाढली आहे, यावर देखील एक दृष्टीक्षेप टाकण्यात आला आहे.

भारत चीनलाच आपला प्रमुख शत्रू मानतो. पाकिस्तानही भारतासाठी काहीशी दुय्यम समस्या आहे, अशी भारताची भूमिका असल्याचे म्हटले आहे. चीनचा धोका कमी करण्यासाठी भारत विविध देशांसोबत हिंदी महासागरात सराव, प्रशिक्षण, शस्त्रास्त्र विक्री आणि माहिती पुरवून आणि मदत करीत मैत्री वाढवत आहे.

### भारताचा वाढता सहभाग..

इंडो-पॅसिफिक भागात भारत द्विपक्षीय, त्रिपक्षीय सहभाग वाढवत आहे. ब्रिक्स, शांघाय को-ऑपरेशन ऑरगनायजेशन आणि आसियान यासारख्या बहुपक्षीय मंचांवर भारत सक्रिय सहभाग वाढवत आहे, हे संपूर्ण जगाच्या लक्षात आले असून ही कूटनीतीच भारताला यशाच्या मार्गावर घेऊन जात आहे असे अहवाल सांगतो.

### 'मेड इन इंडिया', आणि आत्मनिर्भरता!

संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भर बनण्यावर, 'मेड इन इंडिया' वर भारताचा भर कायम असेल, असे अहवालात सांगण्यात आले असून भारत आणि रशियाच्या मैत्रीबाबत महत्त्वाचे उल्लेख आहेत, ते म्हणजे, २०२५ मध्ये देखील भारत रशियासोबत चांगले संबंध राखेल. आर्थिक आणि लष्करी उद्दिष्ट साध्य करण्यासाठी रशिया भारताचा महत्त्वाचा मित्र आहे. नरेंद्र मोदी सत्तेत आल्यापासून भारताने रशियाकडून लष्करी सामग्री घेणे कमी केले आहे. चीन-पाकिस्तानसोबतच्या युद्धात भारत रशियन बनावटीचे रणगाडे, लढाऊ विमानांवरच अवलंबून आहे, असेही त्यात म्हटले आहे. त्यांच्या देखरेखीसाठी सुटे भाग मिळवण्यासाठी रशियासोबत चांगले संबंध असणे भारतासाठी महत्वाचे आहे.

### चीनची पाकवर लष्करी खैरात..

रशिया-चीनमध्ये वाढती जवळीक जास्त घट्ट होऊ नये, यासाठी भारत रशियासोबत चांगले संबंध राखेल. चीनच्या आर्थिक आणि लष्करी खैरातीवर पाकिस्तान तगून राहील आणि चीनच्या जोरावर आपला भारतविरोध कायम राखेल असेही अहवालात म्हटले आहे. प्रत्येक खंडातील, प्रत्येक देशाची संरक्षण सज्जता कशी आहे ? शेजारी देशांशी संबंध कसे आहेत? त्याचा अमेरिकेवर काय परिणाम होईल, याचा बारकाईने अभ्यास केलेला या अहवालातून दिसून येते.

### भारताच्या हालचालींवर लक्ष..

सर्वच देशांचे भारताच्या हालचालींवर अगदी बारकाईने लक्ष आहे. आता, भारत ही चौथी मोठी अर्थव्यवस्था बनली असल्याने भारताची आंतरराष्ट्रीय धोरणे, परराष्ट्रीय धोरणे, आयात निर्यात याचा सगळेच जण विचार करत आहेत. त्यामुळे नरेंद्र मोदी यांचे परदेश दौरे, परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्या गाठीभेटी आणि भारताचे इतर देशांशी होणारे करार, यांचा अभ्यास संपूर्ण जगातील तज्ज्ञ करीत आहेत, हे मुद्दाम नमूद करावेसे वाटते.

### भारताची नियत, दूरदृष्टी, पाया भक्कम..

या सर्व पार्श्वभूमीवर भारताने जी विकासाची वाटचाल चालवली आहे, त्यामागील भारताची नियत, सतत विकासाचे धोरण दूरदृष्टी आणि मूलभूत गरजांमधील पाया भक्कम असल्यामुळेच कोणत्याही देशाच्या कुरघोड्यांचा भारतावर अजिबात परिणाम होणार नाही. फक्त केंद्र सरकारच्या धोरणांना येथील स्थानिक विरोधक कशी साथ देतात, याची काळजी मोदी सरकारला करावी लागणार आहे.. ते झाले तर अर्थव्यवस्थेमध्ये तिसऱ्या क्रमांकावर झेप घेणे भारताला या पंचवार्षिक योजनेत सहज शक्य होणार आहे.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ब्राह्मण संघाचं मनापासून अभिनंदन!

## ब्राह्मण समाजाची संख्या बोटावर मोजण्याइतकीच

।मुंबई। प्रतिनिधी : महाईन्यूज।

**‘संपूर्ण इतिहासात कोणतेही क्षेत्र काढून बघा, त्यात चित्तपावन समाजाची लोकं दिसतात स्वातंत्र्य चळवळ, कला आणि साहित्य क्षेत्र बघा त्यातील दहा नावं काढली तर त्यात तीन ते चार नावं चित्पावन ब्राह्मण समाजाची असतात. राजकीय क्षेत्रात संख्या महत्त्वाची असते असं म्हणत ब्राह्मण समाजाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक महत्वाचं विधान केलं. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते परशुराम भवनाचं उद्घाटन नाशिक या ठिकाणी करण्यात आलं त्यावेळी ते बोलत होते.**



मी चित्पावन ब्राह्मण संघाचं मनापासून अभिनंदन करतो की परशुराम भवन ही सुंदर वास्तू बांधली आणि त्याचं उद्घाटन करण्याची संधी मला दिली त्यासाठी मी तुमचे आभार मानतो. तुम्ही केवळ भवनच उभारलं नाहीत तर हॉस्टेलही उभारलं आहे. ज्यामध्ये ४० मुलांना राहण्याची व्यवस्था असेल. एनडीए किंवा तत्सम प्रोफेशनल परीक्षांच्या संदर्भात मार्गदर्शन आणि मदत करण्याचा निर्णय जो घोषित झाला त्याबद्दल मी आपले आभार मानतो. नाशिकला सकाळी आलो ते सिंहस्थ कुंभमेळा नाशिकमध्ये आयोजित केला जाणार आहे त्यासंदर्भात. विविध पर्वण्यांच्या तारखांची घोषणा आज केली त्यानंतर इथे आलो. मला अतिशय आनंद आहे की ९३ वर्षे सातत्याने एखादी सामाजिक संघटना काम करते आहे. विविध प्रकल्प उभारत समाजाला एकत्र ठेवत, समाजातील गरजूंना मदत करत पुढे जाते अशी उदाहरणं कमी दिसतात असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.पुढे देवेंद्र फडणवीस म्हणाले, चित्पावन ब्राह्मण संघ नाशिक यांचं पुस्तक मी पाहिलं. त्यामध्ये १९३३ ला सभा झाली होती त्याचंही इतिवृत्त वाचायला मिळालं. ज्ञातीच्या संस्था यासाठीच निर्माण करतो की त्या संस्थेच्या माध्यमातून समाजातल्या चांगल्या लोकांचं एकत्रीकरण करता आलं पाहिजे. सर्वांना सोबत घेऊन पुढे जाता आलं पाहिजे. महाराष्ट्र आणि भारताचा इतिहास बघितला तर समाजाचं कुठलंही क्षेत्र काढून बघा, त्यामध्ये आपल्याला अग्रणी चित्पावन ब्राह्मण समाजाचे लोक पाहण्यास मिळतील.

हिंदवी स्वराज्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी जे तयार केलं ते वाढवण्याचं काम असो, भारतीय स्वातंत्र्य लढा असो, समाजातील सुधारणा करण्याचं क्षेत्र असो, कला आणि साहित्य क्षेत्र असो कुठलंही क्षेत्र पाहिलं तर त्या क्षेत्रातली १० ठळक नावं काढली तर त्यातली किमान तीन ते चार नावं चित्पावन ब्राह्मण समाजाची पाहण्यास मिळतात. कारण अतिशय बुद्धिमान आणि अतिशय मेहनती अशा प्रकारचा आपला ब्राह्मण समाज आहे. अत्यंत विषम परिस्थितीतून वर आलेला समाज पाहण्यास मिळतो. सामान्य, मध्यमवर्गीय, गरीब असूनही आपल्या समाजाचे स्वतःच्या कर्तृत्वाने पुढे आलेले लोक आपल्या समाजात पाहण्यास मिळतात.जात अशी असते जी कधी जात नसते. जातीय व्यवस्था असू म्हणण्यापेक्षा जातीय विषमता असू नये हे म्हणणं जास्त समर्पक ठरेल. अनेकदा विषमता दूर करताना आपल्याला अनेक गोष्टींना सामोरं जावं लागतं. मला लोक विचारतात तेव्हा मी सांगतो.

### समाजाचं काम काय ?

सगळ्या प्रकारचे जातीय लोक तुम्ही बघितले, सगळ्या प्रकारचे ब्राह्मण बघितले तर त्यांची संख्या बोटावर मोजण्याइतकी असते. मग मला विचारणा होते की हे चालायचं कसं? तर मी त्यांना नेहमी सांगतो की ब्राह्मण समाजाचं काम काय ? तर दुधात साखरेचं काम करणं हे ब्राह्मण समाजाचं काम आहे. साखर चिमूटभरच लागते पण ती चिमूटभर साखर जेव्हा दुधात टाकली जाते तेव्हा दूध गोड लागतं.समाजात साखरेसारखा गोडवा कसा निर्माण करता येईल हे काम आपल्याला करायचं आहे. त्याचबरोबर समाजाच्या आणि देशाच्या विकासात जसं ऐतिहासिक योगदान आहे तसंच आपली पुढची पिढी योगदान देईल असे संस्कार कसे देता येतील याचा विचार आपण सगळ्यांनी केला पाहिजे.

---

# अधिकाऱ्यावर मासे फेकताना कुणीच पाहिलं नाही

## राणे यांच्यासह 30 जणांची पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता

।मुंबई। प्रतिनिधी : महाईन्यूज।

**महाराष्ट्राचे मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांना २०१७ च्या एका प्रकरणात मोठा दिलासा मिळाला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तत्कालीन मत्स्यव्यवसाय विभागाच्या सहाय्यक आयुक्तांवर मासे फेकल्याप्रकरणी नितेश राणे यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. अधिकारी आणि प्रत्यक्षदर्शींनी दावा केला होता की, मासे कुणी फेकले हे त्यांनी पाहिले नाही.**



सिंधुदुर्गातील अतिरिक्त सत्र न्यायालयात २१ मे रोजी सुनावणी झाल्यानंतर न्यायालयाने बेकायदेशीर जमाव करणे, गुन्हेगारी बळाचा वापर, हल्ला करणे आणि कर्तव्यावर असलेल्या सरकारी कर्मचाऱ्याला दुखापत करणे या आरोपांतून मंत्री नितेश राणे यांच्यासह ३० जणांची निर्दोष मुक्तता केली. सविस्तर आदेश मागच्या आठवड्यात सार्वजनिक झाला.सरकारी वकिलांनी केलेल्या आरोपानुसार, ६ जुलै २०१७ रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास मालवण येथील तत्कालीन मत्स्यव्यवसाय सहाय्यक आयुक्त प्रदीप व्यस्त यांच्या केबिनमध्ये मोठा जमाव घुसला. जिल्ह्यातील मच्छीमार समुदायाला भेडसावणाऱ्या समस्यांबाबत हे आंदोलन करण्यात आले होते. नितेश राणे यांनी मासे फेकले आणि शिवीगाळ केली, असा आरोप झाल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली होती. त्याच दिवशी त्यांना जामीन मंजूर झाला होता. खटल्याच्या सुनावणी दरम्यान वस्त म्हणाले की, त्यादिवशी मासेमारीशी संबंधित विषयांवर चर्चा करण्यासाठी विविध गट त्यांच्या कार्यालयात आले होते. त्यामुळे त्यांच्या केबिनमध्ये गर्दी झाली. आमदार नितेश राणे यांनी दिलेले निवेदन वाचत असताना एका अज्ञाक व्यक्तिने सदर गुन्हा केला. त्यांच्या टेबलावर टोपलीभर बांगडे मासे फेकण्यात आले. यातील एक मासा वस्त यांच्या गालावर आदळला. मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिकाऱ्यांसह इतर चार जणांनीही असाच दावा केला. गुन्हा करताना त्यांनी कुणाला पाहिले नाही.

### एकही ठोस पुरावा समोर आलेला नाही

एफआयआरमध्ये असाही दावा होता की, नितेश राणे यांनी वस्त यांना त्यांच्या खुर्चीत अडवून ठेवत शिवीगाळ केली. मात्र त्यावेळी बराच गोंधळ असल्यामुळे तिथे काय घडले हे नीट ऐकू आले नाही, असे साक्षीदार म्हणाले. न्यायालयाने नमूद केले की, तपास अधिकाऱ्यांनी आरोपीची ओळख परेड केली नाही.सुनावणीनंतर अतिरिक्त सत्र न्यायाधीश व्ही. एस. देशमुख म्हणाले की, आरोपींनी कर्तव्यावर असलेल्या सरकारी अधिकाऱ्याला कर्तव्य बजावत असताना रोखले याबाबतचा एकही ठोस पुरावा समोर आलेला नाही. तसेच सहाय्यक आयुक्त प्रदीप वस्त यांना धमकाविल्याचा किंवा त्यांच्यावर हल्ला झाल्याचा एकाही प्रत्यक्ष साक्षीदार नाही. त्यामुळे सरकारी अधिकाऱ्याच्या कामात अडथळा आणल्याचा गुन्हा सिद्ध होत नाही. जिल्ह्यातील मच्छीमार समुदायाला भेडसावणाऱ्या समस्यांबाबत हे आंदोलन करण्यात आले होते.

# तुम्ही कृष्णाचं सैन्य घेऊ शकता

## तेजस्वी यादव यांची आणखी एक पोस्ट; दिला इशारा?



। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राष्ट्रीय जनता दल पक्षात सध्या वादळ निर्माण झालेले आहे. तेज प्रताप यादव यांना त्यांच्याच वडिलांनी पक्ष आणि कुटुंबातून हद्दपार केले. त्यानंतर आठवडाभर शांत राहिलेले तेज प्रताप यादव आता पुन्हा एकदा सक्रिय झाले आहेत. आज सकाळी त्यांनी वडील लालू प्रसाद यादव आणि आई राबडी देवी यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारी पोस्ट केली होती. त्यानंतर आता त्यांनी आणखी एक पोस्ट करत महाभारतातील कृष्णाचा उल्लेख केला आहे. त्यांचा इशारा पक्षांतर्गत काही लोकांना असल्याचे बोलले जाते.**

तेज प्रताप यादव यांनी या पोस्टमध्ये कुणाच्याही नावाचा उल्लेख केलेला नाही. पण त्यांच्या लिखाणावरून ते लहान भाऊ तेजस्वी यादव याला अर्जुन म्हणत आहेत. तर स्वतःला त्यांनी कृष्णाची उपमा दिली आहे. ते म्हणाले,"काही लोक मला माझ्या अर्जुनापासून वेगळे करण्याचे स्वप्न पाहत आहेत. पण तुम्ही तुमच्या कटात कधीही यशस्वी होणार नाही. तुम्ही कृष्णाची सेना घेऊ शकता, पण खुद्द कृष्णाला नाही."याच पोस्टखाली तेज प्रताप सध्या कुटुंबात चाललेल्या कलहाचा उल्लेख करत तेजस्वी यादव यांच्याशी निष्ठा असल्याचे सांगतात. "मी लवकरच प्रत्येक कटाचा भांडाफोड करणार आहे. माझ्या भावा तू माझ्यावर विश्वास ठेव. परिस्थिती कशीही असली तरी मी तुझ्याबरोबर आहे. सध्या मी खूप दूर आहे. पण माझा आशीर्वाद आणि इच्छाशक्ती सदैव तुझ्यामागे आहे. माझ्या भावा, आई-वडिलांची काळजी घे. जयचंद हे सर्व ठिकाणी आहेत. ते घरात आणि बाहेरही आहेत", असा इशारा तेज प्रताप यादव यांनी दिला.तेज प्रताप यांनी आपल्या आई-वडिलांसाठी लिहिलेल्या भावनिक पोस्टनंतर काही वेळाने ही नवीन पोस्ट टाकली आहे. "आई-बाबा, तुम्ही माझे विश्व आहात. तुमचा आदेश मला देवापेक्षाही मोठा आहे. मला फक्त तुमचा विश्वास आणि प्रेम हवे आहे, त्यापेक्षा अधिक काही नको", असे तेज प्रताप यादव या पोस्टमध्ये म्हणाले होते.या वर्षअखेरीस बिहारमध्ये विधानसभेच्या निवडणुका होत आहेत. तसेच जुलै महिन्यात राष्ट्रीय जनता दलाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची निवड होणे अपेक्षित आहे. या दोन मोठ्या घटनांच्या पार्श्वभूमीवर तेज प्रताप सारख्या नेत्याला पक्षातून बाहेर काढणे, तसेच ज्या कारणासाठी पक्षातून काढले गेले, त्या कारणावरून होणारी चर्चा, यामुळे आरजेडी समोरच्या अडचणी वाढलेल्या आहेत. २५ मे रोजी तेज प्रताप यांच्या फेसबुकवर त्यांनी कथित प्रेयसी अनुष्का यादव यांचा फोटो पोस्ट केला होता. तसेच १२ वर्षांपासून आपले प्रेमसंबंध असल्याची कबुली दिली होती. या फोटोनंतर बिहारच्या राजकारणात खळबळ उडाली. कारण २०१८ साली तेज प्रताप यादव यांचे लग्न झालेले होते. त्यानंतर काही महिन्यातच त्यांच्यात वाद निर्माण झाले. सदर प्रकरण समोर आल्यानंतर पूर्व पत्नी ऐश्वर्या राय यांनीही यादव कुटुंबावर टीका केली. तेजस्वी यादव यांनी अद्याप या विषयापासून अंतर राखलेले आहे. त्यांनी मोठ्या भावाचा वैयक्तिक विषय असल्याचे म्हटले. तसेच आम्ही अशा गोष्टीचे समर्थन करत नाही.

### अर्जुनापासून वेगळे करण्याचे स्वप्न

,राजकीय आणि वैयक्तिक जीवन वेगवेगळे असायला हव, असे ते पत्रकारांशी बोलताना म्हणाले.तेज प्रताप यादव यांनी या पोस्टमध्ये कुणाच्याही नावाचा उल्लेख केलेला नाही. पण त्यांच्या लिखाणावरून ते लहान भाऊ तेजस्वी यादव याला अर्जुन म्हणत आहेत. तर स्वतःला त्यांनी कृष्णाची उपमा दिली आहे. ते म्हणाले, "काही लोक मला माझ्या अर्जुनापासून वेगळे करण्याचे स्वप्न पाहत आहेत. पण तुम्ही तुमच्या कटात कधीही यशस्वी होणार नाही. तुम्ही कृष्णाची सेना घेऊ शकता, पण खुद्द कृष्णाला नाही."याच पोस्टखाली तेज प्रताप सध्या कुटुंबात चाललेल्या कलहाचा उल्लेख करत तेजस्वी यादव यांच्याशी निष्ठा असल्याचे सांगतात.

# गाझामध्ये पुन्हा नरसंहार, इस्रायलीकडून हल्ला

## हल्ल्यानंतर जखमी पॅलेस्टिनींना केले रुग्णालयात दाखल



। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**दक्षिण गाझामधील रफाह येथे अमेरिकेच्या निधीतून उभारण्यात आलेल्या मदत वितरण केंद्राजवळ इस्रायली सैन्याने केलेल्या गोळीबारात किमान ३० पॅलेस्टिनी ठार झाले आणि ११५ हून अधिक जण जखमी झाले आहेत. हजारो पॅलेस्टिनी मदत केंद्राजवळ सर्व जमले होते, तेव्हा ही घटना घडली. एका स्थानिक पॅलेस्टिनी पत्रकाराने बीबीसी न्यूजला सांगितले की इस्रायली टँकने गर्दीवर गोळीबार केला. इंडिया टुडेने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.**

मृतांचे आणि जखमींचे मृतदेह घटनास्थळावरून वाहून नेण्यात आले आहेत. आज सकाळी गाझामधील रफाहजवळ झालेल्या हल्ल्यानंतर जखमी पॅलेस्टिनींना नासेर रुग्णालयात दाखल केले जात आहे. या घटनेवर प्रतिक्रिया व्यक्त करताना, हमासने रफाहमध्ये कार्यरत असलेल्या इस्रायली सैन्यावर "तथाकथित 'मानवतावादी मदत' वितरण स्थळांवर जमलेल्या भुकेल्या नागरिकांविरुद्ध एक नवीन हत्याकांड" घडवत असल्याचा आरोप केला आणि त्यांना "मानवतावादी मदत स्थळे नव्हे तर सामूहिक मृत्यूचे सापळे" असे संबोधले.मृतांचे आणि जखमींचे मृतदेह घटनास्थळावरून वाहून नेण्यात आले आहेत. आज सकाळी गाझामधील रफाहजवळ झालेल्या हल्ल्यानंतर जखमी पॅलेस्टिनींना नासेर रुग्णालयात दाखल केले जात आहे. दक्षिण गाझामधील रफाह येथे अमेरिकेच्या निधीतून उभारण्यात आलेल्या मदत वितरण केंद्राजवळ इस्रायली सैन्याने केलेल्या गोळीबारात किमान ३० पॅलेस्टिनी ठार झाले आणि ११५ हून अधिक जण जखमी झाले आहेत. हजारो पॅलेस्टिनी मदत केंद्राजवळ सर्व जमले होते, तेव्हा ही घटना घडली. एका स्थानिक पॅलेस्टिनी पत्रकारानेसलेल्या इस्रायली सैन्यावर "तथाकथित 'मानवतावादी मदत' वितरण स्थळांवर जमलेल्या भुकेल्या नागरिकांविरुद्ध एक नवीन हत्याकांड" घडवत असल्याचा आरोप केला.

### हत्याकांड घडवत असल्याचा आरोप

मृतांचे आणि जखमींचे मृतदेह घटनास्थळावरून वाहून नेण्यात आले आहेत. आज सकाळी गाझामधील रफाहजवळ झालेल्या हल्ल्यानंतर जखमी पॅलेस्टिनींना नासेर रुग्णालयात दाखल केले जात आहे. या घटनेवर प्रतिक्रिया व्यक्त करताना, हमासने रफाहमध्ये कार्यरत असलेल्या इस्रायली सैन्यावर "तथाकथित 'मानवतावादी मदत' वितरण स्थळांवर जमलेल्या भुकेल्या नागरिकांविरुद्ध एक नवीन हत्याकांड" घडवत असल्याचा आरोप केला आणि सामूहिक मृत्यूचे सापळे" असे संबोधले.मृतांचे आणि जखमींचे मृतदेह घटनास्थळावरून वाहून नेण्यात आले आहेत. आज सकाळी गाझामधील रफाहजवळ झालेल्या हल्ल्यानंतर जखमी पॅलेस्टिनींना नासेर रुग्णालयात दाखल केले जात आहे.

# लग्नाच्या वाढदिवसानिमित्त पतीसाठी लिहिली खास पोस्ट

मराठी नाटक, मालिका, चित्रपट अशा तिन्ही माध्यमांतून आपल्या अभिनयाचा ठसा घराघरांत उमटवणारी लोकप्रिय अभिनेत्री म्हणून विशाखा सुभेदारला ओळखलं जातं. तिचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. 'फु बाई फु', 'कॉमेडीची बुलेट ट्रेन' ते 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' अशा विनोदी कार्यक्रमांतून विशाखाने रसिक प्रेक्षकांचं भरभरून मनोरंजन केलं. कलाविश्वात काम करताना कुटुंबीयांची सुद्धा साथ महत्त्वाची असते. विशाखाला या सगळ्या प्रवासात तिच्या पतीने खंबीरपणे पाठिंबा दिला. आज विशाखा सुभेदारच्या लग्नाचा २७ वा वाढदिवस आहे. यानिमित्ताने खास पोस्ट शेअर करत अभिनेत्रीने नवऱ्याचं कौतुक केलं आहे. १९९८ मध्ये अभिनेत्रीने महेश सुभेदार यांच्याशी लग्न केलं. खरंतर, लग्नानंतरच तिच्या आयुष्याला खऱ्या अर्थाने कलाटणी मिळाली आणि यानंतर विशाखाने कधीच मागे वळून पाहिलं नाही. तिचे पती





महेश हे सुद्धा अभिनेते आहेत.सोबत, साथ, जीवनप्रवासाची २७ वर्षे...! प्रचंड खडतर प्रवास, कधी तू कुठे, मी कुठे... आणि अगदी आजही तेच, पण तरीही तू आहेस आणि मी ही! ही भावना कायम...! भांडणं झाली, रुसवेफुगवे, चढउतार, काटकसर, पैसा उधळ त्यावरून वचवच, स्कूटर ते फोर व्हिलर...! सगळंच तुझ्या साथीने... THANK U MAHESH SUBHEDAR सगळ्यासाठी... एक मात्र प्रांजळपणे कबूल करते कायमच... बायको पुढे जातेय म्हणून कधीही तुझ्यातला पुरुषीअहम जागा होऊ दिलास नाही... नवरा म्हणून मला सपोर्ट केलास, पाठीशी उभा राहिलास. माझी प्रत्येक गोष्ट मी तुला सांगते..

## ते मला हातोड्याने मारायचे

रवी किशन किरण रावच्या नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'लापता लेडीज' या चित्रपटात महत्त्वाच्या भूमिकेत दिसले. या चित्रपटाच्या निमित्तानं दिलेल्या एका मुलाखतीत त्यांनी वडिलांबरोबरच्या नात्याबद्दल सांगितलं. रामलीलामध्ये अभिनय करण्यास सुरुवात केल्यावर वडील खूप रागावले होते. पण नंतर मात्र आपण सिनेसृष्टीत करिअर केल्यावर त्यांना माझा खूप अभिमान वाटत होता, असं रवी किशन यांनी सांगितलं. 'ब्रुट'ला दिलेल्या एका मुलाखतीत रवी किशन यांनी खुलासा केला की वडिलांच्या रागामुळे त्यांना १७ व्या वर्षी घरातून पळून जावं लागलं होतं. "माझे वडील मला खूप मारत होते, ते मला हातोड्याने मारायचे. त्यांना माझा खून करायचा होता आणि माझ्या आईला माहित होतं की बाबा मला मारू शकतात. ते माझा जीव घेण्यास मागेपुढे पाहणार नाही. त्यामुळे आई मला म्हणाली की 'पळून जा'. खिशात ५०० रुपये घेऊन मी घर सोडलं आणि मुंबईला जाणारी ट्रेन पकडली होती," असं रवी किशन म्हणाले.रवी किशन यांनी वडिलांच्या अशा वागणुकीचं समर्थनही केलं. "ते पुजारी होते आणि ब्राह्मण असल्याने मी शेती करावी किंवा पुजारी व्हावं किंवा सरकारी नोकरी करावी अशी त्यांची इच्छा होती. आपल्या कुटुंबात एखादा कलाकार जन्माला येऊ शकतो,.

## सारा खानने केला रॅम्प वॉक



'मर्डर मुबारक' या चित्रपटामुळे अभिनेत्री सारा अली खान सध्या चांगलीच चर्चेत आली आहे. सारा नेहमी तिच्या व्यावसायिक व वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत असते. अशातच सध्या साराचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होतं आहे. हा व्हिडीओ पाहून अनेकजण तिचं कौतुक करत आहेत. अभिनेत्री सारा अली खानचा हा व्हायरल व्हिडीओ सेलिब्रिटी फोटोग्राफर 'विरल भयानी' या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओत, सारा भाजलेल्या जखमेसह आत्मविश्वासाने रॅम्प वॉक करताना दिसत आहे. ती निळ्या रंगाच्या लेहेंग्यामध्ये खूप सुंदर दिसत आहे. यावेळी तिने पोटावर भाजलेल्या जखमेचा मेकअप न करताना, ती जखम फ्लॉन्ट करताना पाहायला मिळत आहे.साराचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून नेटकरी तिचं कौतुक करत आहे. 'शेरनी', 'क्यूट लूक' अशा प्रतिक्रिया नेटकरी देत आहेत.दरम्यान, साराच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, 'मर्डर मुबारक'नंतर २१ मार्चला ओटीटीवर तिचा 'ऐ वतन मेरे वतन' चित्रपट प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात साराने उषा मेहता यांची भूमिका निभावली आहे. धर्मा प्रोडक्शनची निर्मिती असलेल्या या चित्रपटात सारासह अभिनेता इमरान हाश्मी पाहायला मिळणार आहे.'मर्डर मुबारक' या चित्रपटामुळे अभिनेत्री सारा अली खान सध्या चांगलीच चर्चेत आली आहे. सारा नेहमी तिच्या व्यावसायिक व वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत असते. अशातच सध्या साराचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होतं आहे. हा व्हिडीओ पाहून अनेकजण तिचं कौतुक करत आहेत. अभिनेत्री सारा अली खानचा हा व्हायरल व्हिडीओ सेलिब्रिटी फोटोग्राफर 'विरल भयानी' या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओत, सारा भाजलेल्या जखमेसह आत्मविश्वासाने रॅम्प वॉक करताना दिसत आहे. ती निळ्या रंगाच्या लेहेंग्यामध्ये खूप सुंदर दिसत आहे. यावेळी तिने पोटावर भाजलेल्या जखमेचा मेकअप न करताना, ती जखम फ्लॉन्ट करताना पाहायला मिळत आहे.साराचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून नेटकरी तिचं कौतुक करत आहे. 'शेरनी', 'क्यूट लूक' अशा प्रतिक्रिया नेटकरी देत आहेत.दरम्यान, साराच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, 'मर्डर मुबारक'नंतर २१ मार्चला चित्रपटात साराने

## देवाशिष माखिजा यांनी व्यक्त केली खंत

मनोज बाजपेयींच्या 'जोरम' या चित्रपटाचे दिग्दर्शक देवाशिष माखिजा यांनी नुकतीच एक मुलाखत दिली. यामध्ये त्यांनी चित्रपट, राजकारण, कला, त्यांचा प्रवास आणि संघर्ष याविषयी सांगितले. एक चांगला चित्रपट बनवण्यासाठी किती मोठा संघर्ष करावा लागतो हे त्याने या मुलाखतीमध्ये सांगितले. 'आज्जी' आणि 'जोरम'सारखे अप्रतिम चित्रपट बनवल्यानंतरही पुढचा चित्रपट बनवणे कठीण असल्याचं त्याने स्पष्ट केलं. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'जोरम'ला अप्रतिम रेटिंग मिळाले तसेच समीक्षकांनीही चित्रपटाला उचलून धरले पण त्यानंतरही देवाशिष यांचा संघर्ष सुरूच आहे. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीमध्ये देवाशिष म्हणाले, "२० वर्षे या इंडस्ट्रीमध्ये काम करूनसुद्धा माझ्या एकाही चित्रपटातून आर्थिक फायदा मला झालेला नाही. माझी चाळीशी उलटून चालली आहे अन् म्हणालेकमावले नाहीत. मला माझ्या घराचे भाडे भरणेदेखील जमत नाहीये. गेले पाच महीने मी भाडे दिलेले नाही. सध्या मी माझ्या घरमालकाकडे विनंती करतो आहे की त्याने मला घराबाहेर काढू नये. जेव्हा तुम्ही तुमच्या कलागुणांना अधिक प्राधान्य देता तेव्हा त्याची एक मोठी किंमत तुम्हाला चुकवावी लागते." हा एक संघर्ष आणि यासाठी ते तयार आहेत असंही देवाशिष या मुलाखतीदरम्यान म्हणाले.




## क्रिती आणि पुलकित यांनी बांधली लग्नगाठ

अभिनेत्री क्रिती खरबंदा आणि अभिनेता पुलकित सम्राटयांनी लग्नगाठ बांधली आहे. दोघांचा लग्नसोहळा धुमधडाक्यात पार पडला आहे. क्रिती आणि पुलकित या नवविवाहित जोडप्याने नुकतेच त्यांच्या लग्नसोहळ्याचे खास फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. त्यांच्या या फोटोंवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे.क्रिती आणि पुलकित यांनी शेअर केलेल्या लग्नसोहळ्याच्या फोटोमध्ये दोघेही खास लूकमध्ये दिसत आहेत. लग्नसोहळ्यासाठी क्रितीनं पिंक कलरचा लेहंगा आणि स्टोनची ज्वेलरी असा लूक केला होता. तर पुलकितनं लग्नसोहळ्यात सी ग्रीन कलरची शेरवानी परिधान केली होती. पुलकितच्या शेरवानीच्या डिझाईननं अनेकांचे लक्ष वेधले होते.2014 मध्ये पुलकितनं श्वेता रोहिरासोबत लग्न केले होते. श्वेता ही सलमान खानची 'राखी सिस्टर' आहे. पण पुलकित आणि श्वेता यांचा संसार फार काळ टिकला नाही. पुलकित आणि श्वेता यांनी 2015 मध्ये घटस्फोट घेतला.वीरे की वेडिंग आणि तैश या चित्रपटांमध्ये क्रिती आणि पुलकित यांनी काम केलं आहे. पण पागलपंती या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान क्रिती आणि पुलकित हे एकमेकांच्या प्रेमात पडले. फुकरे, फुकरे रिटर्न्स, जय हो या चित्रपटात पुलकितनं काम केलं.

# इंग्लंडचा इंडिजवर दणदणीत विजय!

## वेस्ट इंडिजचा पराभव करत 2-0 ने मालिका आपल्या नावे केली

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**इंग्लंडचा संघ वेस्ट इंडिजविरूद्ध तीन सामन्यांची वनडे मालिका खेळत आहे. या मालिकेतील सलग दोन सामने जिंकत इंग्लंडने वेस्ट इंडिजविरूद्धची मालिका २-० ने जिंकली. दुसऱ्या सामन्यात १६६ धावा करत जो रूट सामन्याचा हिरो ठरला. तर दोन्ही सामन्यांमध्ये मुंबई इंडियन्स आणि आरसीबी संघातील खेळाडूंनी मोठं योगदान दिलं आहे.**



### जो रूटने 166 धावांची खेळी केली

इंग्लंडकडून साकिब महमूदने ३ विकेट्स आदिल रशीदने ४ विकेट्स, तर ब्रायडन कार्स, जेकब बेथल आणि विल जॅक्सने प्रत्येकी १-१ विकेट घेतली.वेस्ट इंडिजने दिलेल्या ३०९ धावांच्या प्रत्युत्तरात इंग्लंडची सुरुवात खूपच वाईट झाली. जॅमी स्मिथ आणि बेन डकेट शून्यावर बाद झाले. यानंतर आलेल्या जो रूटने पहिल्या दोन विकेटची कसर भरून काढली. जो रूटने १३९ चेंडूत २१ चौकार आणि २ षटकारांसह १६६ धावांची नाबाद खेळी केली. यासह तो वनडेमध्ये इंग्लंडकडून सर्वाधिक ७ हजार धावा करणारा खेळाडू ठरला.रूटशिवाय कर्णधार हॅरी ब्रुकने ४७ धावांची जेकब बेथल १७ धावा तर विल जॅक्स ४९ धावा करत बाद झाले. जो रूट शेवटपर्यंत नाबाद राहिला आणि त्याने चौकारासह संघाला विजय मिळवून दिला.तर पहिल्या डावात फलंदाजी करत ४०० धावा केल्या होत्या. या सामन्यात इंग्लंडच्या सर्व फलंदाजांनी ३० च्या वर धावा करत संघाला मोठ्या धावसंख्येपर्यंत नेले होते.

दुसरा वनडे सामना कार्डिफमध्ये खेळवला जात होता. या सामन्यात इंग्लंडने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. यासह प्रथम फलंदाजीला उतरलेला वेस्ट इंडिजाचा संघ ४८व्या षटकात ३०८ धावा करत सर्वबाद झाला. ब्रँडन किंगने चांगली सुरूवात केली. तर दुसरा सलामीवीर खाते न उघडताच बाद झाला. किंगने अर्धशतकी खेळी केली. यानंतर तुफान फॉर्मात असलेल्या केसी कार्टीने अजून शतक झळकावलं. कार्टीने १०५ चेंडूत १३ चौकारांसह १०३ धावा केल्या.यानंतर कर्णधार शे होपने ७८ धावांची उत्कृष्ट खेळी केली. यानंतर कोणताच फलंदाज मोठी खेळी करू शकला नाही. परिणामी वेस्ट इंडिजचा संघ सर्वबाद झाला. इंग्लंडकडून साकिब महमूदने ३ विकेट्स आदिल रशीदने ४ विकेट्स, तर ब्रायडन कार्स, जेकब बेथल आणि विल जॅक्सने प्रत्येकी १-१ विकेट घेतली.वेस्ट इंडिजने दिलेल्या ३०९ धावांच्या प्रत्युत्तरात इंग्लंडची सुरूवात खूपच वाईट झाली. जॅमी स्मिथ आणि बेन डकेट शून्यावर बाद झाले. यानंतर आलेल्या जो रूटने पहिल्या दोन विकेटची कसर भरून काढली. जो रूटने १३९ चेंडूत २१ चौकार आणि २ षटकारांसह १६६ धावांची नाबाद खेळी केली. यासह तो वनडेमध्ये इंग्लंडकडून सर्वाधिक ७ हजार धावा करणारा खेळाडू ठरला.रूटशिवाय कर्णधार हॅरी ब्रुकने ४७ धावांची जेकब बेथल १७ धावा तर विल जॅक्स ४९ धावा करत बाद झाले. जो रूट शेवटपर्यंत नाबाद राहिला आणि त्याने चौकारासह संघाला विजय मिळवून दिला.तर पहिल्या डावात फलंदाजी करत ४०० धावा केल्या होत्या. या सामन्यात इंग्लंडच्या सर्व फलंदाजांनी ३० च्या वर धावा करत संघाला मोठ्या धावसंख्येपर्यंत नेले होते. तर प्रत्युत्तरात वेस्ट इंडिजला १६२ धावांवर सर्वबाद करत तब्बल २३८ धावांनी सामना जिंकला. या सामन्यातही साकिबने ३ विकेट्स आणि जेमी ओव्हरटनने ३ विकेट्स घेतलेमुंबई इंडियन्सच्या ताफ्यातील विल जॅक्सने पहिल्या सामन्यात २४ चेंडूत ५ चौकार आणि एका षटकारासह ३९ धावांची खेळी केली होती. तर दुसऱ्या सामन्यात विल जॅक्सने २८ चेंडूत २ चौकारांसह ४९ धावांची खेळी केली तर गोलंदाजीत एक विकेटही घेतली. तर आरसीबीचा फलंदाज जेकब बेथल पहिल्या सामन्याचा सामनावीर खेळाडू ठरला. त्याने पहिल्या सामन्यात ५३ चेंडूत ८ चौकार आणि ५ षटकारांसह ८२ धावांची खेळी केली होती. तर दुसऱ्या सामन्यात १७ धावा केल्या.खेळवला जात होता. या सामन्यात इंग्लंडने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. यासह प्रथम फलंदाजीला उतरलेला वेस्ट इंडिजाचा संघ ४८व्या षटकात ३०८ धावा करत सर्वबाद झाला. ब्रँडन किंगने चांगली सुरुवात केली. तर दुसरा सलामीवीर खाते न उघडताच बाद झाला. किंगने अर्धशतकी खेळी केली. यानंतर तुफान फॉर्मात असलेल्या केसी कार्टीने अजून शतक झळकावलं. कार्टीने १०५ चेंडूत १३ चौकारांसह १०३ धावा केल्या.यानंतर कर्णधार शे होपने ७८ धावांची उत्कृष्ट खेळी केली. यानंतर कोणताच फलंदाज मोठी खेळी करू शकला नाही. परिणामी वेस्ट इंडिजचा संघ सर्वबाद झाला

# 1.सूर्यकुमार यादवने रचला इतिहास!

## सूर्यकुमार यादवने डिव्हिलियर्स, ऋषभ पंतला टाकले मागे

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आयपीएल २०२५ मध्ये सूर्यकुमार यादव मुंबई इंडियन्स संघासाठी अत्यंत महत्त्वाचा खेळाडू ठरला आहे. त्याने त्याच्या कामगिरीत कमालीचे सातत्य दाखवले आहे. सूर्यकुमार यादव हा मुंबई इंडियन्स आणि पंजाब किंग्ज यांच्यातील दुसऱ्या क्वालिफायर सामन्यात पुन्हा एकदा दमदार खेळी केली आणि यासह तो एका आयपीएल हंगामात ७०० धावा करणारा पहिला नॉन-ओपनर फलंदाज बनला आहे.**



### युजवेंद्र चहलने त्याला बाद केले

तर पंतने आयपीएल २०१८ मध्ये दिल्ली कॅपिटल्सकडून खेळताना ६८४ धावा केल्या होत्या.सूर्याने दुसऱ्या क्वालिफायर सामन्यात २६ चेंडूंमध्ये ४४ धावा केल्या, ज्यामध्ये त्याने चार चौकार आणि तीन षटकार देखील लगावले. मात्र १४व्या ओव्हरच्या पाचव्या चेंडूवर युजवेंद्र चहलने याने त्याला बाद केले.

आयपीएल २०२५ मध्ये सूर्यकुमार यादव मुंबई इंडियन्स संघासाठी अत्यंत महत्त्वाचा खेळाडू ठरला आहे. त्याने त्याच्या कामगिरीत कमालीचे सातत्य दाखवले आहे. सूर्यकुमार यादव हा रविवारी (१ जून) रोजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर मुंबई इंडियन्स आणि पंजाब किंग्ज यांच्यातील दुसऱ्या क्वालिफायर सामन्यात पुन्हा एकदा दमदार खेळी केली आणि यासह तो एका आयपीएल हंगामात ७०० धावा करणारा पहिला नॉन-ओपनर फलंदाज बनला आहे.एका आयपीएल हंगामात सर्वाधिक धावा करणाऱ्या नॉन-ओपनर्सच्या यादीमध्ये सूर्याच्या नंतर एबी डिव्हिलियर्स आणि ऋषभ पंत यांचा क्रमांक आहे. डिव्हिलीयर्सने २०१६ च्या हंगामात आरसीबीकडून खेळताना ६८७ धावा केल्या होत्या तर पंतने आयपीएल २०१८ मध्ये दिल्ली कॅपिटल्सकडून खेळताना ६८४ धावा केल्या होत्या.सूर्याने दुसऱ्या क्वालिफायर सामन्यात २६ चेंडूंमध्ये ४४ धावा केल्या, ज्यामध्ये त्याने चार चौकार आणि तीन षटकार देखील लगावले. मात्र १४व्या ओव्हरच्या पाचव्या चेंडूवर युजवेंद्र चहलने याने त्याला बाद केले. सूर्याने चहलला षटकार मारण्याचा प्रयत्न केला पण नेहल वधेराने त्याचा सीमारेषेजवळ कॅच घेतला. पंजाब किंग्जविरुद्ध खेळताना सूर्याने तिलक वर्मा (२९ चेंडूत ४४ धावा) बरोबर मिळून तिसऱ्या विकेटसाठी ७२ धावांची भागीदारी केली. आयपीएलच्या इतिहासात मुंबई इंडियन्ससाठी एका हंगामात ७०० धावा करणारा सूर्या हा पहिलाच फलंदाज आहे. आयपीएल २०२५ मध्ये सूर्यकुमार यादव मुंबई इंडियन्स संघासाठी अत्यंत महत्त्वाचा खेळाडू ठरला आहे. त्याने त्याच्या कामगिरीत कमालीचे सातत्य दाखवले आहे. सूर्यकुमार यादव हा रविवारी (१ जून) रोजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर मुंबई इंडियन्स आणि पंजाब किंग्ज यांच्यातील दुसऱ्या क्वालिफायर सामन्यात पुन्हा एकदा दमदार खेळी केली आणि यासह तो एका आयपीएल हंगामात ७०० धावा करणारा पहिला नॉन-ओपनर फलंदाज बनला आहे एबी डिव्हिलियर्स आणि ऋषभ पंत यांचा क्रमांक आहे. डिव्हिलीयर्सने २०१६ च्या हंगामात आरसीबीकडून खेळताना ६८७ धावा केल्या होत्या.

स्मार्ट PCMC
SMART CITY

# महाईन्यूज

ePaper

। सोमवार ।
। दि. 2 जून 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती





Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17k+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13k+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org


Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's
GAYATRI GROUP OF SCHOOLS,
PUNE
ADMISSIONS OPEN
2025-26
PRE-PRIMARY
TO
HIGHER-SECONDARY
For more info
95277 64646 / 77967 67292


Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
ADMISSION
OPEN
2025-2026
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
Computer Science
Crop Science
Electronics
Mechanical / Technical Automobile
Information Technology (IT)
For Commerce Stream
Banking
Marketing & Sales
Office Management
Small Industries & Self employment
Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241